बातमीपत्र

पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

माहिती कक्ष, दि २० मे २०२३

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३१६/२०२३ भादवि ४२०,४०६,५०६ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | फेब्रुवारी व एप्रिल २०२२ रोजी फिर्यादी चे राहते घरी ०४,तळमजला फेज-३,वसंत विहार राजा गणपती जवळ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०५/२०२३ रोजी १९.४५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सुहासिनी सुधीर कुलकर्णी,वय-७२ वर्षे,रा- ०४ तळमजला फेज-३ वसंत विहार राजा गणपती जवळ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | कय्युम इब्राहिम शेख,वय-१०२,बॉम्बे पार्क जुळे सोलापूर |
| **फसवणुक र** | | ६,५५,०००/- रूपये |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, फेब्रुवारी व एप्रिल २०२२ मध्ये यातील आरोपी मजकूर यांने फिर्यादीचा व तिचे पतीचा विश्वास संपादन करून त्यांचे बांधकाम व्यवसायामध्ये गुंतवणुक केल्यास फिर्यादीस चांगला परतावा देतो असे आश्वासन देवून त्याचेकडे पैसे गुंतवणुक करण्यास उद्युक्त केले त्यानुसार फिर्यादीने आरोपीस एकूण ८,२०,०००/- रू रोख स्वरूपात फिर्यादीचे राहते घरात दिले त्यापैकी आरोपीने फिर्यादीस मदत केली त्याचे १,६५,०००/- रुपये वगळुन उर्वरित ६,५५,०००/- रू परत दिले नाहीत आरोपीस फिर्यादीने वेळोवेळी पैसे मागितले नंतर आरोपीने फिर्यादीस आयडीबीआय बॅकेच्या खात्यावर पैसे शिल्लक नाहीत हे माहित असताना फिर्यादीचे जावाई याचे नावे न वटणारे चेक दिले त्यानंतर देखील अरोपीस त्याचे मोबाईलवर संपर्क करून पैसे परत करण्याची मागणी केली असता आरोपीने फिर्यादीस तुम्ही यापुढे मला पैसे मागायचे नाहीत पैसे मागीतल्यास तुमच्या सर्वाना जीव मारून टाकतो तुमचे पैसे परत करणार नाही तुम्हाला काय कररायचे आहे ते करा माझे कोणीही काही वाकडे करू शकत नाही माझे हात फार लांबवर आहे अशी धमकी दिली आहे.म्हणून.तपास- पोसई भोईटे- **७९७२११९७५१** |

## फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३१७/२०२३ भादवि ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १८/०५/२०२३ रोजी २०.०० वा ते दि २१.०० वा झांबरे नर्सिग होमचे बाजूस बोळात एस.टी.स्टॅन्डचे बाजूस सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०५/२०२३ रोजी २२.५३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | कैलास नागनाथ महाजन,वय-४५ वर्षे,रा- ६०/१ ए विदया नगर शेळगी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | १५,०००/- रू ची सुझुकी कंपनीचे सिलींग शॉट प्लस मो.सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीच्या ताब्यातील मो.सायकल क्र एमएच २५ झेड ९६१८ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करून पार्क करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने वरील वर्णनाची व किंमतीची मो.सायकल ही फिर्यादीचे संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरून नेलीआहे.म्हणून.तपास- पोना/७३२/कामुर्ती-८८०५०५१३०० |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३३१/२०२३ भादवि ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १७/०५/२०२३ रोजी २३.३० वा ते दि १८/०५/२०२३ रोजी ०७.३० वा चे सुमारास फिर्यादीचे राहते घरासमोरून सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०५/२०२३ रोजी २०.१६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | प्रदिप विलास पालमुरी,वय-३७ वर्षे,रा- ९०/१०४,बालाजी मंदिर समोर रंगराज नगर सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |

| | | |
|---|---|---|
| **गेला माल** | | १०,०००/- रू ची काळया व सिल्वर रंगाची हिरो स्प्लेंडर मो.सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीच्या ताब्यातील मो.सायकल क्र एमएच १३ ए पी ७६२३ ही वरील ठिकाणी हॅन्डल लॉक करून पार्क करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने वरील वर्णनाची व किंमतीची मो.सायकल ही फिर्यादीचे संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे.म्हणून.तपास-मपोह/२०२/मैदाड-९९२३४३२३५५ |

## जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २६६/२०२३ भादवि ३२४,३२३,५०४,५०६ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १८/०५/२०२३ रोजी २०.३० वा फिर्यादीचे राहते घरी ३२५/१५,मराठा वस्ती भवानी पेठ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०५/२०२३ रोजी ०२.११ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | आरीफ सलीम शेख,वय-३० वर्षे,रा- ३२५/१५,मराठा वस्ती भवानी पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | आसीफ सलीम शेख,रा- सदर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी घरी असताना त्याचा मधला भाऊ आरोपी मजकूर हा दारू पिवून येवून आजी पार्वती नबीलाल शेख हिस पुन्हा दारू पिण्यासाठी पैशाचा तगादा लावून तिला शिवीगाळ करून तिचे खोलीतील सामानाची आदळ आपट करीत असताना आजी झोपलेली असताना तिचे अंगावर घरातील लोखंडी कपाट पाडल्याने आजीचे उजवे हाताचे चामडे निघाले असून तिचे छातीला व कमरेला मुक्कामार लागून जखमी झाली आहे.म्हणून.तपास- मपोह/५०२/ओहळ- |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २७७/२०२३ भादवि ३२४,३२३,५०४,५०६ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १७/०५/२०२३ रोजी १२.०० वा चे सुमारास फिर्यादीचे राहते घरी पारधी वस्ती चैतन्य मार्केट विजापूर रोड सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०५/२०२३ रोजी ०१.१७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | महादेव रंगु पवार,वय-४० वर्षे,रा- पारधी वस्ती चैतन्य मार्केट विजापूर रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) चंदु जेठप्पा चव्हाण,२) कैलास चव्हाण, ३) जॅकी चव्हाण,सर्व रा- पारधी वस्ती चैतन्य मार्केट विजापूर रोड सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी घरी असताना फिर्यादीचा मुलगा अजय यांचा सासरा यातील आरोपी क्र १ याने माझ्या मुलीला शिवीगाळ का केली व त्रास का दिला असे म्हणून आरोपी क्र २ याने हातातील दगडाने फिर्यादीचे डोक्यात मारून जखमी केले तसेच अरोपी क्र १ व ३ यांनी काठीने फिर्यादीचा मुलगा अजय याला मारहाण केली व शिवीगाळ करून फिर्यादीस लाथाबुक्यांनी मारहाण केली आहे.म्हणून.तपास- पोह/१२०१/जाधव- |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ३१७/२०२३ भादवि ३९२,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १८/०५/२०२३ रोजी २१.१५ वा. उध्दव नगर रोडवर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०५/२०२३ रोजी ०२.३४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सरीता दत्तात्रय अंकुशे,वय-३३ वर्षे,रा- १३८,रेणुका नगर सैफुल विजापूर रोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात दोन इसम |
| **गेला माल** | | ६०,०००/- रू चे २ तोळे वजनाचे सोन्याचे मिनी मंगळसूत्र जुवाकिअ |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी ही हुतात्मा स्मृती मंदिर येथील कार्यक्रम संपवून घरी जात असताना नमुद ठिकाणी आले असता पाठीमागून अचानक दोन अनोळखी इसम त्याच्या पांढऱ्या रंगाच्या स्कुटीवर येवून फिर्यादीचे स्कुटरच्या समोर आडवी उभी करून फिर्यादीस सॉरी म्हणुन फिर्यादीचे जवळ येवून फिर्यादीचे गळयातील नमुद वर्णनाचे व किंमतीचे मिनी मंगळसूत्र हिसका मारून तोडून |

| | | |
|---|---|---|
| | | घेवून तेथून पळून गेले आहे.म्हणून.तपास- पोसई मुरकुटे-**८६६८८१९२८५** |

## सलगरवस्ती पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ७७/२०२३ भादवि ३२४,५०४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १८/०५/२०२३ रोजी १९.३० वा.चे सुमारास फिर्यादीचे किराणा दुकानासमोर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०५/२०२३ रोजी ००.३७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | शैलेश राजप्पा जाधव,वय-२८ वर्षे,रा- १८,मंजुनाथ नगर रामवाडी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | दिपक ऊर्फ पठाण मोहन जाधव रा-मंजुनाथ नगर रामवाडी सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की,वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी व त्याची पत्नी भाग्यश्री असे फिर्यादीचे दुकानात बसले असताना यातील वरील नमुद आरोपी हा फिर्यादीचे दुकानासमोर येऊन जोरात गाडीचा ब्रेक मारला तेव्हा त्याची मोटार सायकल फिर्यादीचे मोटार सायकल जवळ येऊन थांबली तेव्हा फिर्यादी हा दुकानाबाहेर येऊन दिपक यास गाडी सावकाश चालवत जा असे म्हणाले असता आरोपी हा गाडीवरून उतरून फिर्यादीस शिवीगाळ करू लागला व फिर्यादीचे अंगावर धावून आला व तेथेच पडलेला एक फरशीचा तुकडा घेवून फिर्यादीचे डोक्यात घातले व फिर्यादीचे डोकयाला घातले व फिर्यादीचे डोक्याला जखम होवून रक्त येवून डोकीस जखम झाली आहे.म्हणून.तपास-पोह/४६७/यलगुलवार- |

## विजापूर नाका पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | २८०/२०२३ भादवि ४२०,आयटी ॲक्ट ६६ (डी) प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २७/०४/२०२३ रोजी १०.०० वा.ते दि २९/०४/२०२३ रोजी ००.०० वा चे सुमारास फिर्यादीचे राहते घरी सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०५/२०२३ रोजी २३.२७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | असिफ आयुब शेख,वय-२४ वर्षे,रा-२६,गजानन नगर होटगीरोड सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | मो.क्र ९१९०३१२८७३३९ व टेलीग्राम वरील Anna नावाची टेलीग्राम युज @rr२६५५९३ |
| **फसवणुक र** | | १,०५,०००/- रू रक्कम |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यातील फिर्यादी हा घरात बसल्या असता सकाळी १०.०० वा चे सुमारास फिर्यादीच्या ॲपल मोबाईल कंपनीचा स्मार्ट फोन असून त्यामध्ये व्हाटसअप व टेलीग्राम इंन्स्टाग्राम हे ॲप वापरत असताना त्यामध्ये टेलीग्राम वर work from home म्हणून स्टेटस दिसला त्यावर फिर्यादीने क्लीक केले असता त्यामध्ये एक अनोळखी क्र मो.क्र ९१९०३१२८७३३९ हा दिसला त्यावरून फिर्यादीने त्या अनोळखी क्रमांक यावर मेसेज करून त्याच्याशी मेसेजव्दारे बोलले त्यावेळी फिर्यादीने त्या अनोळखी नंबर वाल्यानी मेसेजव्दारे सांगितले की दररोज २,०००/- ते २०,०००/- कमवा असे त्यांनी सांगितले तेव्हा फिर्यादीने त्या अनोळखी इसमाला तुम्ही कोण आहात व आपली कोणती कंपनी आहे त्याबाबत विचारले की ॲमेझॉन कंपनीमध्ये मी हायरींग मॅनेजर,ॲमेझॉन पार्टनर्स असे त्यांचे पद सांगून त्यांनी फिर्यादीचा विश्वास संपादन केले त्यानंतर त्यांनी फिर्यादीस तुम्ही कोठे काम करता कोठे राहता असे माहिती विचारले असता सदरची माहिती फिर्यादीने त्यांना व्हाटसअपवर पाठविली होती.<br>त्यानंतर त्यांनी एक लिंक पाठविली http://mallsshop८.cc/index/user/register/invite-code/३GK२XM.html ही लिंक ओपन करण्यास सांगितले ते क्लीक केल्यास एक रजिस्टरेशन करण्याचे पेज ओपन झाले होते, त्यामध्ये त्यांनी सांगितल्याप्रमाणे त्या लिंकव्दारे वेबसाईटवर फिर्यादीचे रजिस्टररेशन करून पासवर्ड ठेवले होते अनोळखी व्यक्तीचे क्रमाक ९१९०३१२८७३३९ यावर फिर्यादीस टेलीग्रामव्दारे मॅसेज आला की सदर लिंक वर क्लिक केल्याने Anna नावाची टेलीग्राम युज @rr२६५५९३ यावर एक मुलीचा फोटो होता.त्यांनी सर्व कामाची पध्दत सांगितले व पुढील स्टेप पुर्ण करण्यासाठी सांगितले असे एकूण तीन स्टेप पुर्ण करून तीसऱ्या स्टेप मध्ये एक QR CODE पाठविला ते स्कॅन करून त्यावर पेमेंट करा असे सांगितले होते तीसऱ्यावेळेस २ हजार रक्कम भरण्यास सांगितले.त्याप्रमाणे ती |

| | | |
|---|---|---|
| | | रक्कम रिजार्च केली, अशाप्रकारे फिर्यादीस परत तीन वेळा २ हजार रूपये पाठविण्यास सांगितले त्याप्रमाणे फिर्यादी हा पैसे भरत गेला. तसेच त्यांनी दिलेली रक्कम जर मी भरलो नाही तर जेवढी रक्कम यापुर्वी भरलेली आहे ती सर्व रक्कम बुडेल असे सांगितल्याने या भिंतीने ते सांगितल्याप्रमाणे फिर्यादी पैसे भरत गेला<br>त्यानंतर फिर्यादीने ५ हजार, २० हजार ,७२ हजार रूपये अशी रक्कम रिचार्ज करत गेला त्यांनी दिलेला टास्क पुर्ण केल्याने फिर्यादीने त्या Anna नावाची टेलीग्राम युज @rr२६५५९३ चे शी मेसेजव्दारे बोलणे केले की मी पुर्ण टास्क पुर्ण केला आहे त्यावर कमीशन १,३४,२००/- येवढे आहे असे दोन्ही मिळून २,३९,२००/- असे तुम्हाला मिळतील पण तुम्हाला त्या रकमेवरील २० टक्के रू ४७,८२०/- येवढी रक्कम ही टॅक्स पे करावे लागेल असे सांगितले असता फिर्यादीने त्यांना विचारले की सदर टॅक्स ऑफिस कोठे आहे तेथे जावून सदरचे टॅक्स पे करतो असे विचारले असता त्यांनी उडवा-उडवीचे उत्तरे दिले होते, तसेच पैसे परत मागितले असता त्यांनी पैसे परत दिले नाहीत म्हणून फिर्यादीची सदर अज्ञात व्यक्तीनी आर्थिक फसवणुक केली आहे अशी खात्री झाली म्हणून.तपास- वपोनि हनपुडे-पाटील- **९१५८६३२६२६** |